# सुरक्षा रक्षक मंडळांच्या कार्यालयीन कामकाजाबाबत चौकशी अहवाल

सादरकर्ता:
विकास आयुक्त
(असंघटीत कामगार)
महाराष्ट्र राज्य, मुंबई

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते कि सुरक्षा रक्षक मंडळाच्या कार्यालयीन कामकाजाची चौकशी करण्याबाबत दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने चौकशी समितीस विविध सुरक्षा रक्षक मंडळानी सादर केलेली माहिती, कागदपत्रे व चौकशी समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबींच्या अनुषंगाने चौकशी समितीचा अहवाल (एकूण पृष्ठे १ ते २५) विकास आयुक्त (असंघटीत कामगार) यांच्या कार्यालयाने तयार केला असून, आज दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी शासनास सादर करण्यात आला आहे.

(विजय शिंदे)
सरकारी कामगार अधिकारी

(सुनिता म्हैसकर)
सहाय्यक कामगार आयुक्त

(पंकज कुमार, भा.प्र.से.)
विकास आयुक्त
(असंघटीत कामगार)

दिनांक: ३१ ऑक्टोबर २०१८
स्थळ: मुंबई

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | पार्श्वभूमी व संदर्भ | ३ |
| २ | चौकशीची कार्यपद्धती | ४ |
| ३ | सुरक्षा रक्षक मंडळ - पार्श्वभूमी | ६ |
| ४ | सुरक्षा रक्षक मंडळ - सद्य:स्थिती | ८ |
| ५ | निरीक्षणे व निष्कर्ष - आस्थापना विषयक व प्रशासकीय बाबी | १० |
| ६ | पदभरती व पदोन्नती | १० |
| ७ | खरेदी व मालमत्ता | १० |
| ८ | बँकेतील अपहार | ११ |
| ९ | लेखापरीक्षण | १२ |
| १० | निरीक्षणे व निष्कर्ष - अधिनियमातील योजनांची अंमलबजावणी | १४ |
| ११ | नोंदणी | १४ |
| १२ | सुट | १४ |
| १३ | लेव्ही | १५ |
| १४ | वृत्तपत्रात प्रकाशित झालेल्या प्रतिकूल बातम्या | १५ |
| १५ | कल्याणकारी योजना | १६ |
| १६ | सेवा कर | १७ |
| १७ | शिफारशी - आस्थापना विषयक व प्रशासकीय बाबी संबंधित | २० |
| १८ | शिफारशी - अधिनियमातील योजने संबंधित | २१ |
| १९ | परिशिष्ट १ (मंजूर, भरलेले व रिक्त पदे) | २३ |
| २० | परिशिष्ट २ (नोंदीत कार्यरत सुरक्षा रक्षक कामगार व मालक संख्या) | २४ |
| २१ | परिशिष्ट ३ (लेव्ही व प्रशासकीय लेव्ही) | २५ |

## पार्श्वभूमी व संदर्भ

शासनाचे पत्र क्र. युडब्लूए-२०१८/प्र.क्र. ९५/काम-५ उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक १०.०४.२०१८ अन्वये माथाडी / सुरक्षा रक्षक मंडळाच्या कार्यालयीन कामकाजाची चौकशी करण्याबाबत एक सदस्यीय चौकशी समितीमार्फत चौकशी करण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला असून समितीने मंडळाच्या कामकाजाची व मंडळामार्फत राबविल्या जाणा-या योजनांची अंमलबजावणी अधिनियमातील तरतूदीनुसार करण्यात येते किंवा कसे याची सखोल चौकशी करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

## चौकशीची कार्यपद्धती

- शासनाचे आदेशाचे अनुषंगाने विकास आयुक्त (असंघटीत कामगार) कार्यालय यांनी दिनांक २३.०५.२०१८ रोजीचे पत्रान्वये सह आयुक्त कामगार यांच्यामार्फत राज्यातील सर्व सुरक्षा रक्षक मंडळाकडून उक्त अधिनियमांअंतर्गत राबविण्यात येणा-या योजना व त्यांच्या अमंलबजावणीची पद्धत, मंडळातील कामगार व मालक प्रतिनिधींची नावे, मागिल ५ वर्षामध्ये प्राप्त झालेल्या लेखी तक्रारी तथा वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या प्रतिकुल बातम्या तसेच लेखापरिक्षणाचा तपशिल सादर करण्यास विलंबाबाबतची कारणे इत्यादी माहिती मागविण्यात आली.
- सदर माहितीचे अवलोकन केल्यानंतर दिनांक २०.०६.२०१८ रोजीचे पत्रान्वये मंडळासंबंधित विविध मुद्दांची माहिती मंडळाकडून मागविण्यात आली सदरची माहिती मध्ये मंडळामधील कर्मचा-यांची कार्यरत पदे, रिक्त पदे भरती करताना बिंदूनामावलीचे पालन केले किंवा कसे, शासनाची मंजूरी घेतली काय? मंडळाकडील नोंदित मालक कामगार संख्या, मंडळाची मजूरी अथवा लेव्हीचे स्विकारण्याची पद्धत, मंडळामार्फत केलेल्या खरेदीबाबतचा तपशिल, कामगाराची नोंदणी करण्यासाठीची आवश्यक पात्रता, मंडळामार्फत राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजना, लेव्हीचे व्यवस्थापन, लेखापरिक्षणास विलंबाबतचा खुलासा, नोंदणी प्रकिया सोयीची होण्यासाठी सूचविण्यात येणारी सुधारणा याबाबत सविस्तर माहिती मागविण्यात आली.

- मंडळाचे कामकाजाबाबत प्रत्यक्ष पडताळणी करण्यासाठी दिनांक १४/०८/२०१८ रोजी सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा व रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांना प्रत्यक्ष भेट देऊन कामकाजाची पाहणी केली.

# महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण)अधिनियम,१९८१

पार्श्वभूमी :-

राज्यातील कारखाने व आस्थापनांमध्ये कार्यरत असलेल्या खाजगी सुरक्षा रक्षकांची त्यांच्या नियोक्ता ठेकेदाराकडून होणारी पिळवणूक थांबविण्यासाठी, त्यांच्या नोकरीचे नियमन करण्यासाठी, त्यांच्या नोकरीबाबत अधिक चांगल्या सेवाशर्ती तयार करण्यासाठी, त्यांना कल्याणकारी योजनेचे फायदे देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ अंमलात आणला आहे.

२. सदर अधिनियम राज्याच्या विधीमंडळाने पारीत केला असून त्यास मा. राष्ट्रपती यांची अनुमती दि. २४.०९.१९८१ रोजी मिळाली आहे. महाराष्ट्र शासनाने राजपत्र भाग-४ (असाधारण) दि. २५ सप्टेंबर, १९८१ रोजी याबाबत अधिसूचना प्रसिध्द केली आहे.

३. या अधिनियमाअंतर्गत कंत्राटदारामार्फत नियुक्त केलेल्या व कारखाने व आस्थापना येथे तैनात असलेल्या सुरक्षा रक्षकांच्या कंत्राटी पध्दतीचे निर्मुलन करुन सुरक्षा रक्षकांची नोंदणी थेट मंडळात करुन, कारखाने व आस्थापना यात मुख्य मालकाची नोंदणी करुन, त्यांचाकडे तैनात करुन, त्यांचे आर्थिक शोषण थांबवून व त्यांचेकरीता सेवेच्या अधिक चांगल्या सेवाशर्ती ठरवून व त्यांच्याकरीता कल्याणकारी योजना राबविण्याकरीता मंडळ गठीत करण्याची तरतुद करण्यात आलेली आहे.

४. हा कायदा राज्यात सर्वप्रथम अध्यादेश निर्गमित करुन दि. २९ जून, १९८१ ला बृहन्मुंबई व ठाणे या जिल्हयास लागू करण्यात आला व त्या कायद्याची अंमलबजावणी

करण्याकरीता बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाची स्थापना दि. १६ जुलै, १९८१ रोजी करण्यात आली. तसेच या अधिनियमामार्फत खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना, १९८१, दि. १.१०.१९८१ पासून लागू करण्यात आली.

५. तद्नंतर सदर अधिनियम हा राज्यातील नाशिक, पुणे, रायगड, औरंगाबाद, नागपूर येथे दिनांक ५ डिसेंबर, २००२ रोजी लागू करण्यात आला. हा कायदा दि. २७/०२/२००९ रोजी राज्यातील धुळे, नंदुरबार, जळगाव, सांगली, सातारा आणि गोंदिया या जिल्हयांकरीता लागू करण्यात आला. तसेच या जिल्हयांकरीता दिनांक २१/०२/२०१२ रोजी २००२ ची महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना (सुधारीत) देखील लागू करण्यात आली. आजमितीस राज्यात १४ सुरक्षा रक्षक मंडळे स्थापन करण्यात आलेली असून, या १४ सुरक्षा रक्षक मंडळांच्या कार्यक्षेत्रात ३० जिल्हयांचा समावेश करण्यात आलेला आहे.

६. मंडळात नोंदीत होणाऱ्या सुरक्षा रक्षक व त्यांच्याकडून काम करुन घेणारे कारखाने व आस्थापना यांचे मुख्य मालक यांचेकडून, या सुरक्षा रक्षकांच्याकरीता प्रदेय ठरणारे वेतन मंडळात जमा करुन अशा सुरक्षा रक्षकांच्या वेतनाचे प्रदान मंडळ त्यांना करीत असते. तसेच नोंदीत सुरक्षा रक्षकांकरीता नोंदीत मुख्य मालकांकडून वेतनाशिवाय लेव्ही (वेतनाच्या सर्वसाधारण ४२%) दरमहा वसूल करुन या लेव्हीतून सुरक्षा रक्षकांकरीता भविष्य निर्वाह निधी, कामगार विमा योजना, उपदान, भरपगारी रजा, सानुग्रह अनुदान, बोनस, गणवेश, बूट इत्यादी लाभ मंडळाकडून दिले जातात.

सदर लेव्हीमधील सरासरी ५% लेव्ही प्रशासकीय खर्चासाठी वापरण्यात येऊन त्यातून मंडळातील कर्मचाऱ्यांचे वेतन व इतर कार्यालयीन खर्च भागवण्यात येतो.

७. मंडळात नोंदीत होणाऱ्या खाजगी सुरक्षा रक्षकांचे वेतन व इतर सेवाशर्ती ठरविण्याचे व त्यात वेळोवेळी सुधारणा करण्याचे किंवा त्याचे पुन:निर्धारण करण्याचे अधिकार मंडळास आहेत. तसेच मंडळाकडून नियुक्त होणाऱ्या निरीक्षकांमार्फत उक्त कायदा व त्याअंतर्गत तयार करण्यात आलेली योजना यातील कायदेशीर तरतुदींची अंमलबजावणी करण्यात येते.

सद्य:स्थिती :-

राज्य शासनाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ६ अन्वये राज्यात १४ सुरक्षा रक्षक मंडळांची स्थापना करण्यात आली असून, उक्त कायद्यात योजनेची अंमलबजावणी या मंडळांकडून ३० जिल्हयांमध्ये सध्या सुरु आहे. तसेच राज्यातील उर्वरित ६ जिल्हयांकरीता मंडळ स्थापन करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

२. राज्यात सुरक्षा रक्षक मंडळांकडे १६५० कारखाने व आस्थापनांचे नोंदीत मुख्य मालक कार्यरत आहेत व ३६०६० नोंदीत सुरक्षा रक्षक कार्यरत असून त्यांच्या सेवा उक्त मंडळात नोंदीत असलेल्या मुख्य मालकांच्या आस्थापना व कारखान्यांना देण्यात येत आहेत.

३. १४ सुरक्षा रक्षक मंडळांकडून नोंदीत सुरक्षा रक्षकांकरीता दरमहा सरासरी १३,०००/- इतके वेतन मंडळामध्ये जमा होऊन त्याचे प्रदान केले जाते. तसेच या वेतनावर सर्वसाधारणपणे ४२% लेव्ही आकारुन त्याद्वारे सरासरी सुमारे रु. ५४६०/-

प्रति सुरक्षा रक्षक लेव्ही मंडळात दरमहा जमा होते. यातून सुरक्षा रक्षकांना भविष्य निर्वाह निधी, कामगार विमा योजना, यासारख्या सामाजिक सुरक्षेचे फायदे दिले जातात व या लेव्हीतून त्यांचा बोनस, सानुग्रह अनुदान, भरपगारी रजा व इतर अनुज्ञेय सेवाशर्तींच्या तरतुदी करुन लाभ प्रदान केले जातात. यातील ५% लेव्ही ही मंडळ प्रशासन चालविण्याकरीता व इतर प्रशासकीय बाबींवर खर्च केली जाते.

६. राज्य शासनाच्या कामगार विभागाने सन २००६ मध्ये एक शासन निर्णय निर्गमित करुन राज्यातील सरकारी विभाग/कार्यालय/उपक्रम यांनी शासनाने गठीत केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाकडून नोंदीत सुरक्षा रक्षक घ्यावेत, असे निर्देश दिलेत. त्यास अनुसरुन सार्वजनिक आरोग्य विभाग, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शासकीय तंत्र निकेतन, सार्वजनिक बांधकाम विभाग, सरकारी रुग्णालये, केंद्र शासनाचे उपक्रम (उदा. जे.एन.पी.टी.), महानगरपालिका, नगरपालिका इत्यादी विभागांनी त्यांच्याकडे खाजगी एजन्सी मार्फत कार्यरत असलेल्या सुरक्षा रक्षकांची मंडळाकडे नोंदणी करुन ते मुख्य मालक म्हणून मंडळात नोंदीत झाले आहेत किंवा मंडळाकडे नोंदीत असलेल्या सुरक्षा रक्षकांच्या सेवा मंडळाकडून त्यांनी घेतलेल्या असून, त्यांचे वेतन व लेव्ही त्यांचेकडून मुख्य मालक म्हणून सुरक्षा रक्षक मंडळाकडे दरमहा जमा केली जात आहे.

## निरीक्षणे व निष्कर्ष:

शासनाने चौकशी समितीमार्फत सुरक्षा रक्षक मंडळांची चौकशी करण्याबाबतचे आदेशामध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे, चौकशी समितीस विविध सुरक्षा रक्षक मंडळानी सादर केलेली माहिती, कागदपत्रे व चौकशी समितीस निदर्शनास आलेल्या बाबींच्या अनुषंगाने चौकशी समितीचे निरीक्षणे व निष्कर्ष खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

अ. आस्थापना विषयक व प्रशासकीय बाबी

१. पदभरती व पदोन्नती

शासनाने स्थापित केलेल्या सर्व सुरक्षा रक्षक मंडळांनी मंजूर पदे भरतांना शासन निर्णय क्रमांक बीसीसी-१०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब दि.२९ मार्च, १९९७ व बीसीसी-१०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब, दिनांक १८ ऑक्टोबर, १९९७ अन्वये बिंदुनामावलीचे पालन करणे अपेक्षीत होते. तथापि फक्त ४ मंडळांनी पदभरती केली असून बिंदुनामावलीचे पालन केल्याचे दिसून येत नाही.

२. खरेदी व मालमत्ता

शासन निर्णय क्रमांक भांखस-१०८८/ (२५१२)/ उद्योग-६,दि. ०२ जानेवारी, १९९२ व भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१५ अन्वये शासनाच्या अंगीकृत मंडळामध्ये खरेदी करताना अवलंबवण्याची कार्यप्रणाली नमुद केलेली आहे तथापि सुरक्षा रक्षक मंडळांमध्ये खरेदी प्रक्रीया करताना निविदा प्रक्रीया राबविण्यात आल्याचे दिसून येत नाही. १४ सुरक्षा

रक्षक मंडळांमार्फत दैनंदिन कामकाजाकरीता वेगवेगळया सॉफ्टवेअर करीता रुपये ३८६९०४९/- (रुपये अडतीस लक्ष एकोणसत्तर हजार एकोणपन्नांस मात्र) एवढी रक्कम खर्च करण्यात आलेली आहे व हार्डवेअर करीता रुपये १४७४९७०७/- ( रुपये एक कोटी सत्तेचाळीस लक्ष एकोणपन्नांस हजार सातशे सात मात्र) एवढी रक्कम खर्च करण्यात आलेली आहे. यावरुन सर्व मंडळांनी वेगवेगळे सॉफ्टवेअर घेतले असल्याचे दिसून येते. सर्व मंडळांचे कामकाज एकसारखे असल्याने यासाठी जर एकच सॉफ्टवेअर खरेदी करण्यात आले असते, तर सदर खर्चात भरपूर प्रमाणात बचत करणे शक्य झाले असते.

सहा सुरक्षा रक्षक मंडळांनी कार्यालय भाडे तत्वावर घेतले आहेत व त्यापैकी एका मंडळाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून भाड्याचे निर्धारण करुन घेतलेले नाही, त्यामुळे सदर भाड्याचे दर वाजवी आहेत किंवा नाहीत याचा बोध होत नाही. तीन सुरक्षा रक्षक मंडळाने वाहन खरेदी केलेले असुन त्यापैकी एक मंडळाने शासनाची मंजुरी घेतलेली नाही. कामाची व्याप्ती लक्षात घेता आवश्यक ठिकाणी वाहन उपलब्ध करुन देण्याची गरज आहे.

### ३. बँकेतील अपहार

सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा या मंडळामार्फत कॉर्पोरेशन बँक दादर मुंबई येथे रुपये ३ कोटींची गुंतवणूक ठेव ३६ महिन्याकरीता ठेवण्यात आली होती. सदरच्या ठेवीबाबत बँकेकडे कन्फर्मेशन सर्टिफिकेटची मागणी करुनही बँकेचा प्रतिसाद न आल्याने बँकेत प्रत्यक्ष भेट देऊन कागद पत्राची पहाणी केली असता मंडळाच्या

परवानगी शिवाय सदरच्या रुपये ३ कोटी मुदत ठेवीवर रुपये २ कोटी तारण कर्ज दिल्याचे निर्देशनास आले. सदर प्रकरणी संबंधीत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केलेला आहे. तथापि बँकेकडून गुंतवणुकीची मुळ रक्कम व्याजासह मंडळास प्राप्त झालेली आहे.

बँक ऑफ महाराष्ट्, मिरा रोड शाखा येथे मंडळामार्फत रुपये ५० लक्ष मुदत ठेवीची गुंतवणूक करण्यात आली होती. मंडळाच्या परवानगी शिवाय बनावट कागद पत्राचा वापर करुन मंडळाच्या नावे बनावट खाते उघडून सदरचे रुपये ५० लाख मुदत ठेव तारण दाखवून रुपये २५ लाखाचा ओवर ड्राफ्ट घेण्यात आला. त्याबाबत मिरा रोड पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच बँकेच्या व्यवस्थापकीय संचालकाकडे पुर्ण रक्कम व्याजासह परत मिळण्याची मागणी करुन पाठपुरावा केल्यानंतर बँकेकडून सदरची रक्कम परत मिळालेली आहे.

## ४. लेखापरीक्षण

महाराष्ट्र खाजगी सुरक्षा (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ च्या कलम ९ (२) अन्वये सुरक्षा रक्षक मंडळाचे वार्षिक लेखापरिक्षण होणे आवश्यक असतानाही कोणत्याही सुरक्षा रक्षक मंडळाने लेखापरीक्षण विहीत मुदतीत पुर्ण केलेले नाही. कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे, लेखाविषयी तज्ञ कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे लेखापरीक्षण विहीत मुदतीत पुर्ण केले गेले नाही, असे विविध मंडळांचे म्हणणे आहे. जमा व खर्चा बाबत योग्य काळजी घेण्याबाबत मंडळानी दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. सुरक्षा रक्षक मंडळाचे लेखापरिक्षण हे मंडळाकडून

नियुक्त सनदी लेखापालामार्फत केल्याचे दिसून येते. तथापि मंडळाच्या आर्थिक व्यवहारावर पर्यवेक्षण ठेवण्याकरीता मंडळांचे लेखा परिक्षण महालेखापाल कार्यालयामार्फत होण्याची आवश्यकता आहे.

वरील सर्व बाबींच्या निष्कर्षावरुन सुरक्षा रक्षक मंडळातील भरती प्रक्रीया राबविताना बिंदु नामावलीचे पालन न करणे, सॉफ्टवेअर व हार्डवेअर यांच्या देखभाल दुरुस्तीवर अवाजवी खर्च करणे, मंडळांच्या इमारतींचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निर्धारीत करुन न घेणे, मंडळांचे लेखापरीक्षण वेळेवर शासनास सादर न करणे, या सर्व बाबी गंभीर असून यांच्यावर योग्य ते नियंत्रण ठेवण्याकरीता सर्व मंडळांचे एकत्रिकरण होणे आवश्यक आहे.

एकत्रीत मंडळाला आयुक्त दर्जाच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांचे नियंत्रणाखाली आणण्याची आवश्यकता असून मंडळाचे लेखा विषयक कामकाजासाठी मंडळावर महाराष्ट्र वित्त व लेखा विभागातील वरिष्ठ अधिकारा-याची नियुक्ती करणे आवश्यक आहे. मंडळ एकत्रीत झाल्यानंतर मंडळामधील कर्मचा-याची बदली करणे शक्य होईल जेणेकरून एकाधिकार टाळता येईल.

## ब. <u>अधिनियमातील योजनांची अंमलबजावणी</u>

### १. नोंदणी

सन १९८१ मध्ये सुरक्षा रक्षकांच्या कामाचे नियमन करण्याकरीता, त्यांचेकरीता सेवेच्या अधिक चांगल्या सेवाशर्ती ठरवून व त्यांच्याकरीता कल्याणकारी योजना राबविण्याकरीता, महाराष्ट्र खाजगी सुरक्षा (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ पारीत करण्यात आले. राज्यात ३७१०० कारखाने व २६८३८९३ आस्थापना असूनही असे निदर्शनास येते की, दि. ३१.०३.२०१८ पर्यंत १४ सुरक्षा रक्षक मंडळांत फक्त १६५० इतके नोंदित मालक कार्यरत असून ३६०६० एवढे नोंदीत सुरक्षा रक्षक कार्यरत आहेत. मंडळाची स्थापना झाल्यापासून आतापर्यंत वर्षानुवर्षे मालक व कामगार यांच्या नोंदणीमध्ये घट होत असल्याचे निदर्शनास येत आहे. राज्यातील सर्व कार्यरत सुरक्षा रक्षकांना मंडळात नोंदित करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल विकसित करुन नोंदणीची प्रक्रीया सुलभ करणे आवश्यक आहे.

### २. सुट

मंडळामार्फत सुरक्षा रक्षकांना मूळ पगार, महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, वाहन भत्ता, धुलाई भत्ता व शैक्षणिक भत्ता या स्वरुपात वेतन अदा केले जाते. विविध आस्थापनांना सुरक्षा रक्षक पुरविणा-या एजन्सीमार्फत सुरक्षा रक्षकांना मंडळाने विहीत केल्याप्रमाणे वेतन व इतर आर्थिक लाभ देण्याचे मान्य करुन अशा एजन्सीकडून अधिनियमातील तरतूदी प्रमाणे सुट मिळविण्यासाठी शासनाकडे अर्ज सादर केले जातात तथापि अशा एजन्सीला शासनाकडून

सुट प्राप्त झाल्यानंतर मंडळाने विहीत केलेले सर्व लाभ संबंधीत सुरक्षा रक्षाकांना मिळत असल्याबाबत मंडळाकडून निरीक्षणाव्दारे वेळोवेळी खातर जमा केली जात नसल्याचे दिसून येते. जी फोर एस सिक्युअर सोल्युशन्स (इंडिया) प्रा. लि., पुणे यांना दि. १८ एप्रिल २०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे देण्यात आलेली सुट रद्द करण्यात आली आहे. सबब, पसारा अधिनियमांतर्गत नोंदीत सर्व सुरक्षा रक्षक एजन्सी मार्फत कार्यरत सुरक्षा रक्षक व त्यांचे मुख्य मालकांना मंडळात नोंदित करण्यासाठी अधिनियमामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

## ३. लेव्ही

राज्यातील १४ सुरक्षा रक्षक मंडळामध्ये आकारण्यात येणा-या लेव्हीच्या दरामध्ये एकसमानता दिसून येत नाही. सदरचे दर हे ४२ % पासून ४७.५० % पर्यंत असल्याचे निर्दशनास येते. यामुळे मालक वर्गावर असमान आर्थिक भार पडत असल्याचे दिसून येते. तसेच प्रशासकीय लेव्हीच्या दरामध्ये तफावत दिसून येत असून सदरचे दर ५ % पासून ते ५.५० % पर्यंत असल्याचे आढळून येते. सबब सदरचे लेव्ही दरामध्ये समानता आणणे आवश्यक असल्याने, सर्व मंडळांचे एकत्रिकरण झाल्यास या प्रकारच्या बाबींमध्ये एकसूत्रता आणणे सोयीचे होईल.

## ४. वृत्तपत्रात प्रकाशित झालेल्या प्रतिकूल बातम्या

- पुणे महानगरपालिकेची सुरक्षा रक्षक मंडळात नोंदणी असूनही पालिकेच्या आस्थापनेत सुरक्षा रक्षकाची नेमणूक केली जात

नसल्याबाबत दिनांक २४/०६/२०१६ रोजीच्या आपले महानगर या वृत्तपत्रात बातमी प्रकाशित करण्यात आली होती.

- बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या भरती प्रक्रीयेत मोठया प्रमाणावर अनियमितता झाल्याचे ठाणे लाचलूचपत प्रतिबंधक विभागोंच्या चौकशीतून समोर आल्याची बातमी ०१-०१-२०१७ रोजीच्या महाराष्ट्र टाईम्स या दैनिकात बातमी प्रकाशित करण्यात आली होती.
- बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या २८ सुरक्षा रक्षकांची संशयास्पद भरती करण्यात आली असे दि. २०-०३-२०१७ च्या पुण्यनगरी या दैनिकात बातमी प्रकाशित करण्यात आली होती.

उपरोक्त नमूद बाबींवरुन असे निदर्शनास येते की, मंडळ प्रशासनाकडून कामकाजामध्ये हलगर्जीपणा, हेतूपूर्वक होणारे गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी नोंदणी पारदर्शक पद्दतीने ऑनलाईन पोर्टल द्वारे करण्याची आवश्यकता आहे.

## ५. कल्याणकारी योजना

सुरक्षा रक्षक मंडळांमार्फत अधिनियमामध्ये नमूद केल्याप्रमाणे कामगारांच्या आरोग्य सुरक्षा व कल्याणासाठी सामाजिक सुरक्षेची कल्याणकारी योजना सुरक्षा रक्षक मंडळांमार्फत राबविण्यात येत असल्याचे दिसून येत नाही. कामगार राज्य विमा योजना लागू असलेल्या जिल्हयातील सर्व मंडळांना सदर योजना लागू आहे. फक्त चार मंडळांमार्फत अपघात विमा पॉलिसी घेतल्याचे

दिसून येते. तथापि कामगारांसाठी आरोग्य विषयक शिबीरे, सुरक्षा विषयक साधणे इ. पुरविल्याचे दिसुन येत नाही. सन २००८ मध्ये केंद्रशासनाने पारीत केलेल्या असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियमांतर्गत ९ प्रकारच्या सामाजिक सुरक्षा योजना असंघटीत कामगारांसाठी लागू करण्याची तरतूद असून या योजना सुरक्षा रक्षक कामगारांना लागू करण्याची आवश्यकता आहे व त्या योजना पुढीलप्रमाणे आहे.

**केंद्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना -:**

१. जीवन विमा व अपंगत्व विमा योजना
२. आरोग्य आणि प्रसूतीलाभ योजना
३. निवृत्ती वेतन योजना

**राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना -:**

१. भविष्य निर्वाह निधी योजना
२. कामाच्या ठिकाणी दुखापत झाल्यास अर्थसहाय्य योजना
३. गृहनिर्माण योजना
४. पाल्यांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना
५. कामगार कौशल्य वृध्दी योजना
६. अंत्यविधी अर्थसहाय्य योजना
७. वृध्दाश्रम योजना

### ६. सेवा कर

राज्यातील १४ सुरक्षा रक्षक मंडळामार्फत नोंदीत कामगारांना वेतन, भविष्य निर्वाह निधी व उपदान अदा केले जाते. तथापि प्राप्त माहिती आधारे असे निदर्शनास आले आहे की सेवाकर विभागाकडून मुंबई व ठाणे सुरक्षा रक्षक

मंडळास २०१० ते २०१४ या कालावधीमध्ये एकूण रुपये १३० कोटी रकमेचे ५ नोटीस प्राप्त झाल्या असून रायगड सुरक्षा रक्षक मंडळ, औरंगाबाद सुरक्षा रक्षक मंडळ, नाशिक सुरक्षा रक्षक मंडळासही अशा प्रकारच्या सेवाकर भरण्याबाबत नोटीस प्राप्त झाले आहे. फायनान्स अधिनियम १९४४ च्या कलम ७३ (१) अंतर्गत सुरक्षा रक्षक कामगारांची भरती आणि पुरवठा सेवा यापासून प्राप्त मोबदल्यावर सेवाकर लावण्यात आले. जर सदरचा सेवाकर भरावयाचा झाल्यास तो मंडळाच्या लेव्हीमधून अदा करावा लागेल. त्यामुळे मंडळावर व नोंदीत मालकावर मोठयाप्रमाणात आर्थिक भार पडणार आहे. तथापि पात्र नोंदीत मालक वर्गासाठी मंडळाची भविष्य निर्वाह निधी योजना ईपीएफओ कडे वर्ग केल्यास व असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियमाअर्तंगत महाराष्ट्र राज्य सामाजिक सुरक्षा मंडळाच्या कल्याणकारी योजना सुरक्षा रक्षक कामगारांस लागू केल्यास व कामाचे वाटप बंद केल्यास परिणामत: मंडळाची कामकाजाची कार्यकक्षा कमी होईल व पर्यवेक्षण करणे हे मंडळाचे मुख्य कार्य राहील व सदरच्या सेवाकराचा अतिरिक्त भार सुद्धा टाळता येईल.

वरील सर्व बाबींच्या निष्कर्षावरुन वर्षानुवर्षे नोंदणीमध्ये होणारी घट, राज्यात खाजगी एजन्सी मार्फत कार्यरत लाखो सुरक्षा रक्षकांपैकी अंदाजे केवळ ५ ते १० टक्के सुरक्षा रक्षकांनीच आपली नोंदणी मंडळात करुन घेणे, राज्यातील कारखाने व आस्थापना यात खाजगी एजन्सी / ठेकेदारामार्फत कार्यरत खाजगी सुरक्षा रक्षकांनी कायद्यान्वये नोंदणी बंधनकारक असताना मंडळात नोंदणी न करणे, राज्यातील कारखाने व आस्थापनांमध्ये खाजगी सुट प्राप्त सुरक्षा रक्षक एजन्सीमार्फत सुरक्षा

रक्षक घेण्यास प्राधान्य देणे, सुरक्षा रक्षकांनी व त्यांना तैनात करणाऱ्या मुख्य मालकांनी या कायद्याची अंमलबजावणीकरीता योग्य तो प्रतिसाद न देणे, सुट प्राप्त एजन्सीमार्फत सुरक्षा रक्षकांना मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या वेतन व इतर सेवा शर्ती पेक्षा कमी लाभ देणे, व कल्याणकारी योजनांचा अभाव या सर्व बाबींच्या अनुषंगाने सद्य:स्थितीमध्ये महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ चे पुर्नविलोकन करून आवश्यक सुधारणा करण्याची गरज आहे. सुरक्षा रक्षकांना असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम २००८ नुसार महाराष्ट्र राज्य सामाजिक सुरक्षा मंडळ अंतर्गत सर्व लाभ उपलब्ध करुन दिल्यास कामगारांचे जीवनमान उंचविण्यास मदत होइल.

## सुरक्षा रक्षक मंडळाच्या कार्यालयीन कामकाजाबाबत चौकशी समितीची शिफारशी

१. आस्थापना विषयक व प्रशासकीय बाबी संबंधित

१. सर्व मंजूर केलेल्या पदांसाठी सेवा प्रवेश नियम तयार करणे, रिक्त पदांची भरती पारदर्शक प्रक्रियेद्वारे करणे व भरती करतांना बिन्दुनामावालीचे पालन करणे.

२. मंडळाचे लेखा विषयक कामकाजासाठी मंडळावर महाराष्ट्र वित्त व लेखा विभागातील वरिष्ठ अधिकारा-याची नियुक्ती करणे.

३. कार्यालयाला सरकारी इमारतीत स्थानांतरित करण्यासाठी प्रयत्न करणे व आवश्यक ठिकाणी भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रमाणित करून घेणे. स्वमालकीच्या स्थावर मालमत्तेचे कागदपत्र अद्यावत करणे.

४. मंडळातील सर्व खरेदी शासन निर्णयानुसार/ जीईएम पोर्टलद्वारे करणे.

५. मंडळाचे वार्षिक लेखापरिक्षण निर्धारित वेळेवर करणे आणि अहवाल शासनास विहित कालावधीत सादर करणे.

६. बँक मधील मुदत ठेवींच्या गुंतवणूकीशी संबंधित धोके टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे.

७. सहा गठ्ठा पद्धतीनुसार नस्ती आणि कागदपत्रे तयार करणे व ए, बी, सी, डी वर्गीकरणानुसार नस्ती आणि दस्ताऐवज वर्गीकृत करणे व अनावश्यक कागदपत्रे नष्ट करणे.

८. प्रशासकीय लेव्हीची टक्केवारी पेक्षा अधिक खर्च न करणे.

९. कार्यस्थळातील लैंगिक छळाच्या बाबत "विशाखा मार्गदर्शक तत्त्वानुसार" तक्रारी समिती स्थापन करणे.

२. अधिनियमातील योजनें संबंधित

१. सर्व १४ सुरक्षा रक्षक मंडळांचे विलिनीकरण करुन एकच सुरक्षा रक्षक मंडळाची स्थापना करणे व एकत्रीत मंडळाला आयुक्त दर्जाच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांचे नियंत्रणाखाली आणणे.

२. राज्यभरात कार्यरत सर्व सुरक्षा रक्षक व त्यांचे मुख्य मालक, पसारा अधिनियमांतर्गत नोंदीत सर्व सुरक्षा रक्षक एजन्सी मार्फत कार्यरत सुरक्षा रक्षक व त्यांचे मुख्य मालकांना मंडळात नोंदित करणे.

३. पसारा अधिनियमांतर्गत नोंदीत सर्व सुरक्षा रक्षक एजन्सी मार्फत कार्यरत सुरक्षा रक्षक यांचे, मंडळाने निर्धारित केल्याप्रमाणे, वेतन, भत्ते व इतर लाभ मुख्य मालक / एजन्सी यांनी परस्पर सुरक्षा रक्षकांना अदा करणे.

४. अधिनियमातील कलम २३ मध्ये सुधारणा करून फक्त महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ (MESCO) व महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ (MSSC) यांना सुट देणे व इतर कोणत्याही सुरक्षा रक्षक एजन्सीला सुट देण्याची तरतूद रद्द करणे.

५. सुरक्षा रक्षक कामगारांचे ऑनलाईन नोंदणी, मुख्य मालकाची नोंदणी, लेव्ही गोळा करणे, तसेच योजनांच्या अंमलबजावणीकरीता वेब पोर्टल तयार करणे.

६. विविध प्रकारचे लेव्हीच्या ऐवजी एकसमानता आणून लेव्हीचे तर्कशुध्दीकरण करणे.

७. सुरक्षा रक्षक मंडळामार्फत सुरक्षा रक्षकांचे राखीव / प्रतिक्षा यादी तयार करण्याची व त्यांना काम वाटपाची पद्धत बंद करणे. सुरक्षा रक्षकांसाठी प्रतिक्षा यादी तयार न करता सर्व कार्यरत सुरक्षा रक्षकांच्या नोंदणीसाठी विशेष अभियान आयोजित करणे.

८. नोंदणीकृत मुख्य मालकांची यादी व संबंधित सुरक्षा रक्षक कामगारांची यादी पोर्टलवर प्रदर्शित करणे.

९. सेवा कराच्या कक्षेतून बाहेर राहण्यासाठी काम वाटपाची पद्धती बंद करणे.

१०. पात्र नोंदीत मुख्य मालक वर्गासाठी मंडळाची भविष्य निर्वाह निधी योजना ईपीएफओ कडे वर्ग करणे.

११. सर्व नोंदणीकृत सुरक्षा रक्षक कामगारांना प्रधान मंत्री जिवन ज्योति विमा योजना (PMJJBY) आणि प्रधान मंत्री सुरक्षा विमा योजना (PMSBY) या योजनांचा लाभ देणे.

१२. कामाच्या वेळेस सुरक्षा रक्षक कामगाराने दर्शनीयभागी ओळखपत्र किंवा बॅच लावणे अनिवार्य करणे.

१३. सर्व सुरक्षा रक्षक कामगारांची नियमित आरोग्य तपासणी करणे.

१४. सुरक्षा रक्षक कामगारांच्या कौशल्यवृद्धी साठी प्रशिक्षण आयोजित करणे.

१५. सुरक्षा रक्षक कामगारांना असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम २००८ मध्ये उल्लेखित योजनांचा लाभ देणे.

**********

# परिशिष्ट १ (मंजूर, कार्यरत व रिक्त पदे)

| अ.क्र. | सुरक्षा रक्षक मंडळाचे नाव | मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षा रक्षक मंडळ (बृहमुंबई व ठाणे जिल्हयांकरिता) | | | |
| २ | रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, | ८४ | ३९ | ४५ |
| ३ | पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, | १० | ३ | ७ |
| ४ | नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, | ११ | ५ | ६ |
| ५ | औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, | ८ | १ | ७ |
| ६ | नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, | ६ | ० | ६ |
| ७ | धुळे जिल्हा सुरक्षा मंडळ, | ८ | ० | ८ |
| ८ | सांगली जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ. | ० | ० | ० |
| ९ | अहमदनगर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, | ० | ० | ० |
| १० | अमरावती जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, | ० | ० | ० |
| ११ | चंद्रपुर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ | ० | ० | ० |
| १२ | कोल्हापूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ | ० | ० | ० |
| १३ | रत्नागिरी सिंधुदुर्ग जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, चिपळूण (रत्नागिरी व सिंधुदुर्ग) | ० | ० | ० |
| १४ | सोलापूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, सोलापूर | ० | ० | ० |
| | एकूण | ० | ० | ० |
| | | १२७ | ४८ | ७९ |

## परिशिष्ट २ (नोंदीत कार्यरत सुरक्षा रक्षक कामगार व मालक संख्या)

| अ.क्र. | सुरक्षा रक्षक मंडळाचे नाव | कार्यरत नोंदीत मालक | कार्यरत नोंदीत कामगार |
|---|---|---|---|
| १ | सुरक्षा रक्षक मंडळ (बृहमुंबई व ठाणे जिल्हयांकरिता) | १०४१ | २३५६३ |
| २ | रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, | ११२ | १५३९ |
| ३ | पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, | १२४ | २४७८ |
| ४ | नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, | ६० | १२३८ |
| ५ | औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, | ४७ | ५१४ |
| ६ | नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, | १०४ | २६०२ |
| ७ | धुळे जिल्हा सुरक्षा मंडळ, | १६ | २७१ |
| ८ | सांगली जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ. | १५ | ३६८ |
| ९ | अहमदनगर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, | १३ | २९३ |
| १० | अमरावती जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, | २८ | १८७१ |
| ११ | चंद्रपुर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ | १५ | ५८१ |
| १२ | कोल्हापूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ | २६ | २९७ |
| १३ | रत्नागिरी सिंधुदुर्ग जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, चिपळूण (रत्नागिरी व सिंधुदुर्ग) | ४५ | ४११ |
| १४ | सोलापूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, सोलापूर | ०४ | ३४ |
| | एकूण | १६५० | ३६०६० |

# परिशिष्ट ३ (लेव्ही व प्रशासकीय लेव्ही)

| अ.क्र. | सुरक्षा रक्षक मंडळाचे नाव | लेव्ही % | प्रशासकीय लेव्ही % |
|---|---|---|---|
| १ | सुरक्षा रक्षक मंडळ (बृहमुंबई व ठाणे जिल्हयांकरिता) | ४६.७५ | ५ |
| २ | रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, | ४७.५० | ५ |
| ३ | पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, | ४२.५० | ५ |
| ४ | नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, | ४२ | ५ |
| ५ | औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, | ४२ | ५ |
| ६ | नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, | ४३ | ५ |
| ७ | धुळे जिल्हा सुरक्षा मंडळ, | ४२ | ५ |
| ८ | सांगली जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ. | ४२ | ५ |
| ९ | अहमदनगर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, | ४२ | ५ |
| १० | अमरावती जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, | ४३ | ५ |
| ११ | चंद्रपुर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ | ४३ | ५.५० |
| १२ | कोल्हापूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ | ४२ | ५ |
| १३ | रत्नागिरी सिंधुदुर्ग जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, चिपळूण (रत्नागिरी व सिंधुदुर्ग) | ४२ | ५ |
| १४ | सोलापूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, सोलापूर | ४२ | ५ |
| | सरासरी | ४२.९८ | ५.०३ |